*खेड तालुका शिक्षा प्रसारक मंडळाचे*

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

***मराठी विभाग आयोजित***

## मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रम अहवाल

## दि . २७.२.२०१५

---

जेष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला. या निमिताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयातील ग्रंथालयात मराठी पुस्तकांची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. या उपक्रमाला सांगवीच्या बा. रा. घोलप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोहर चासकर यांनी भेट दिली आणि या उपक्रमाचे कौतुक केले.

मराठी विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना इंटरनेट वरील मराठी विशोकोशासह मराठीतील दर्जेदार संकेत स्थळांची ओळख करून देण्यात आली. या निमिताने झालेल्या कार्यक्रमात महाविद्यालयातील मराठी विभागातील प्राध्यापक डॉ. संजय शिंदे यांनी कुसुमाग्रजांच्या साहित्यिक योगदानाचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांना मराठी भाषेची उत्पती, विकास व सद्यस्थिती बद्दल माहिती दिली. समाज माध्यमात (सोशल मीडिया) मराठी भाषेचा वापर करावा , मराठी भाषेतील दर्जेदार पुस्तकांचे वाचन करावे , मराठी भाषेतील भाषिक वैविध्याचा आभ्यास करावा आणि मातृभाषा म्हणून मराठी भाषेच्या विकासात आपापल्या परीने योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी विध्यार्थ्यांना केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ.एस.बी .पाटील यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्या दिल्या.

डॉ. बी. डी. अनुसे
मराठी विभाग प्रमुख